# पशुसंवर्धन विभाग,जि.प.यवतमाळ

जुनी जि.प.इमारत, सिव्हील लाईन,भावे मंगल कार्यालया समोर,
यवतमाळ, जि.यवतमाळ (महाराष्ट्र) ४४५००१

दुरध्वनी :- ०७२३२ २४२२०३, ई मेल :- dahoyeotmal@gmail.com


## दरपत्रक मागणी, दि.०९.०८.२०१७

**विषय :- आंत्रविषार (Enterotoximia) प्रतिबंधक लसीचे दर पुरविणे.**

या कार्यालयास **आंत्रविषार (Enterotoximia)** प्रतिबंधक लस खरेदी करावयाची आहे. नामांकीत कंपनीची **आंत्रविषार (Enterotoximia)** प्रतिबंधक लस मात्रांचे दर खालील अटी व शर्ती नुसार दिनांक १८.८.२०१७ पर्यंत कार्यालयीन वेळेत बंद पाकीटात पुरवावेत. सदर कालावधी नंतर प्राप्त झालेले दर मान्य करण्यांत येणार नाही याची नोंद घ्यावी.

**अटी :-**

१) दर नमूद करतांना प्रति मात्रा (एक लसमात्रा) सर्व करांसहीत दर नमूद करावेत.
२) लस ही नामांकित उत्पादक कंपनीचीच असावी. तसेच लसीचे पॅकींग हे जास्तीत जास्त ५० मात्रांचे असावे. दर पत्रकामध्ये उत्पादक कंपनीचे नांव नमूद करावे.
३) लसमात्रांची शितसाखळी अबाधित ठेऊन यवतमाळ येथे पोहोच कराव्या लागतील.
४) पुरवठादाराने दर पत्रकावर आपला पॅन क्रमांक व वॅट/जीएसटी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.
५) पुरवठादाराने निविदा सादर करतांना खरेदी प्राधिकाऱ्यासोबत हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि एकल निविदा सादर करित असल्याची हमी द्यावी. (खाली नमूद प्रमाणपत्राचे नमुन्या नुसार प्रमाणित करावे )

**टिप :-** १) बंद पाकीटावर वरच्या बाजूस ठळक अक्षरात **'दरपत्रके'** नमूद करावे.
२) दर मंजूरी संदर्भात अंतिम निर्णय या कार्यालयाने राखून ठेवला आहे.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद,यवतमाळ

---

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यांत येते की, माझे फर्मचा कोणताही हितसंबंध जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.यवतमाळ कार्यालयाशी नाही. तसेच मी ही एकच निविदा (एकल निविदा) आपले कार्यालयास सादर केलेली आहे.

करिता प्रमाणित करण्यांत येत आहे.

स्वा/-